मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 21 नोव्हेंबर 2025 | पान- 1

# नगरसेवक म्हणून नव्हे समाजसेवक म्हणून संधी द्या

## निखिल दादा काळकुटे यांचे जनतेला आवाहन

### विकसनशील प्रभाग : 08

पिंपरी | प्रतिनीधी : २००२ पासून सक्रीय राजकारणात प्रवेश केल्यापासून निखिल दादा काळकुटे यांची वाटचाल ही केवळ सत्तेभोवती न फिरता समाजाभोवती फिरणारी राहिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून शहर उपाध्यक्ष या पदापासून सुरू झालेला प्रवास आज प्रभाग क्रमांक आठच्या सर्वांगीण विकासाच्या संकल्पनेपर्यंत पोहोचला आहे.

नगरसेवकपद ही केवळ राजकीय पायरी नसून लोकसेवेचे प्रभावी व्यासपीठ आहे, या जाणिवेतूनच ते नागरिकांसमोर "पदासाठी नव्हे, समाजसेवेसाठी संधी द्या" असे मनापासून आवाहन करत आहेत.



माझा प्रभाग माझा उमेदवार!

### राजकीय प्रवास आणि भूमिका

निखिल दादांची राजकीय घडण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झाली. शहर उपाध्यक्ष म्हणून कार्यरत राहताना त्यांनी संघटन मजबूत करण्याबरोबरच स्थानिक प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठवला. आमदार महेश दादा लांडगे यांच्या नेतृत्वशैलीने प्रभावित होऊन २०१२ पासून त्यांनी त्यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून काम केले. महेश दादांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला, तेव्हाही कोणतीही राजकीय सोय न पाहता त्यांनी त्यांच्या मागे ठामपणे उभे राहून निष्ठेची एक वेगळी पातळी दाखवून दिली.२०१७ मध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर निखिल दादांना भारतीय जनता पक्ष उद्योग आघाडीचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी मिळाली. या पदामुळे केवळ पुणे जिल्हाच नव्हे तर संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील उद्योजक व सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या प्रश्नांशी त्यांचा जवळचा संपर्क आला. उद्योगधंद्यांच्या अडचणी, रोजगाराच्या संधी, भांडवल अभाव, धोरणात्मक अडचणी या अनेक स्तरांवर त्यांनी तरुण उद्योजकांसाठी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आणि बहुतांश प्रकरणात समाधानकारक तोडगे ही निघाले. या काळात त्यांनी "सत्तेत असो वा नसो, युवकांच्या पाठीशी घट्ट उभे राहणे हाच खरा समाजसेवा मार्ग" हा दृष्टिकोन दृढ केला.

### जनसंपर्काची नवी दिशा

जनसंपर्क अधिक प्रभावी करण्यासाठी, आपण स्वतःच्या जनसंपर्क कार्यालय (ऑफिस) न बसता फिल्डवर जाऊन प्रत्येकाच्या अडी-अडचणी समजून घेण्यास सुरुवात केली. लोकांना त्यांची कामे घेऊन माझ्या दारात यावे लागू नये, म्हणून मी स्वतःहून नागरिकांशी कनेक्ट वाढवण्यासाठी पुढाकार घेतला. यासाठी डिजिटल माध्यम, सोशल मीडिया आणि प्रत्यक्ष भेटीगाठींवर अधिक भर दिला. लोकांना त्यांच्या समस्या घेऊन आपल्यापर्यंत येण्याऐवजी, आपण त्यांच्यापुढे जाऊन त्यांचे प्रश्न समजून घेतले पाहिजेत, हा माझा प्रमुख उद्देश होता. या सर्व उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.





### प्रभाग क्रमांक ८ चे प्रश्न

प्रभाग क्रमांक ८ हा पीएमआरडीए आणि महानगरपालिका अशा दुहेरी हद्दीत अडकलेला भाग असल्याने येथील अनेक मूलभूत प्रश्न वर्षानुवर्ष प्रलंबित आहेत. काही प्रश्न सोडवले गेले असले तरी रस्ते, वीज आणि पाणी या मूलभूत गरजा अजूनही अनेक भागांत पूर्णपणे सुटलेल्या नाहीत. नागरीकरण वेगाने वाढत असताना या प्रभागातील नागरिकांना चांगल्या रस्त्यांची, अखंड वीजपुरवठ्याची आणि पुरेशा पिण्याच्या पाण्याची सुरक्षित हमी मिळावी, यासाठी निखिल दादा सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

आजच्या डिजिटल युगात अन्न, वस्त्र, निवारा आणि मोबाईल हे दैनंदिन जीवनाचे गरज बनली असताना या प्रभागातील मोबाईल नेटवर्कचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक ठिकाणी मोबाईलला रेंजच नसल्याने विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण, कामानिमित्त येणारी कॉल्स, आपत्कालीन सेवा अशा सगळ्यांवर परिणाम होतो. इमारतींवर मोबाईल टॉवर नकोत या समज-गैरसमजांमुळे ही समस्या अधिक तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर व गोवा राज्यांच्या धर्तीवर रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकावर खास खांब उभारून त्यावर मोबाईल टॉवर बसवण्याचा दूरदृष्टीपूर्ण प्रस्ताव निखिल दादा मांडत आहेत, ज्यामुळे आरोग्याविषयीची भीतीही दूर राहील आणि नेटवर्कची समस्या कायमस्वरूपी सुटेल.आरोग्य, महिला आणि युवकांसाठी उपक्रम फक्त निवडणुकीच्या काळात दिसणारा नेता न होता निखिल दादांनी गेल्या कित्येक वर्षांत सातत्याने आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि

(पान २ वर...)

# नगरसेवक म्हणून नव्हे समाजसेवक म्हणून संधी द्या
# निखिल दादा काळकुटे यांचे जनतेला आवाहन

पान १ वरुन...

**प्रभाग क्रमांक ८ चे प्रश्न**

युवक विकास यांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिरे, तपासण्या व जनजागृती मोहिमा राबवून त्यांनी सामान्य माणसाला घराजवळ वैद्यकीय सुविधा मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

महिलांसाठी कौशल्य विकास, स्वावलंबन, स्वसंरक्षण तसेच स्वयंरोजगाराचे मार्ग दाखवणारे अनेक कार्यक्रम त्यांनी राबवले असून, स्वयंसाहाय्य गटांच्या बळकटीकरणावर त्यांनी विशेष भर दिला. युवकांसाठी क्रीडा, रोजगार मार्गदर्शन, कौशल्य प्रशिक्षण या विषयांवर विविध उपक्रमांच्या माध्यमातून काम करण्यात आले आहे. शासनाच्या विविध योजनांची माहिती आणि लाभ प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी स्वतःच्या पातळीवर तसेच कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रभावीरीत्या केले. या सगळ्या उपक्रमातून "सत्ताकेंद्रापेक्षा समाज केंद्र महत्त्वाचे" हे त्यांचे ब्रीद प्रकर्षाने जाणवते. आरक्षित प्रकल्प आणि सर्वांगीण विकास दृष्टीप्रभागातील अनेक आरक्षित जागा आणि प्रकल्प वर्षानुवर्षे कागदोपत्रीच अडकून राहिले आहेत. या आरक्षित प्रकल्पांना मूर्त रूप देऊन नागरिकांच्या उपयोगासाठी उपलब्ध करून देणे ही स्वतःची जबाबदारी समजून निखिल दादा काम करण्याचा निर्धार व्यक्त करतात. बालकांसाठी खेळाची मैदाने, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, सांस्कृतिक उपक्रमांसाठी सभागृहे, शैक्षणिक व क्रीडांगणे यांसारखे प्रकल्प तडीस नेण्याचा त्यांचा स्पष्ट मानस आहे. याबरोबरच प्रभागाचा सर्वांगीण विकास लक्षात घेऊन रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन, पाणीपुरवठा, सार्वजनिक वाहतूक, पथ दिवे, उद्याने, शालेय व आरोग्य सुविधा यांचा समतोल आराखडा तयार करण्याकडे त्यांचा कल आहे. येथील युवा पिढीसाठी नोकरभरती मार्गदर्शन, उद्योग स्थापनासाठी सहाय्य, स्टार्टअप संस्कृती, तसेच क्रीडा-




सांस्कृतिक संधी निर्माण करण्याच्या योजना ते राबवण्याच्या तयारीत आहेत. या माध्यमातून प्रभाग क्रमांक ८ केवळ राहण्यालायक नव्हे तर प्रगत आणि संधींनी भरलेला प्रभाग बनवण्याची त्यांची दृष्टी आहे.



## सभागृहाचा आवाज आणि लोकप्रतिनिधित्वाचा अर्थ

गेल्या पंधरा वर्षांच्या राजकीय अनुभवातून निखिल दादांना एक कटू पण वास्तव जाणवले आहे.  सभागृहात आपला प्रतिनिधी नसेल तर सामान्य नागरिकांचा आवाज अनेकदा दाबला जातो. रस्त्यावर लढा देऊन, निवेदनं देऊन, आंदोलने करूनही प्रश्न जर सभागृहाच्या पातळीवर जोरदारपणे मांडले गेले नाहीत, तर अनेक शासकीय व प्रशासकीय अधिकारी त्याकडे गांभीर्याने पाहत नाहीत. म्हणूनच "लोकांच्या प्रश्नांना खऱ्या अर्थाने न्याय द्यायचा असेल तर सभागृहात उपस्थिती अनिवार्य आहे" या भूमिकेतून ते या प्रभागाच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारण्यास पुढे सरसावत आहेत. त्यांच्या मते, पदं येतात-जातात, पण केलेले काम आणि उभा केलेला विश्वास कायम लोकांच्या मनात राहतो. पदाच्या मोहापेक्षा कामाचा ठसा उमटवणे अधिक महत्त्वाचे आहे, आणि हाच विचार त्यांच्या प्रत्येक शब्दात जाणवतो. समाजाभिमुख दृष्टी, विकासाचा स्पष्ट आराखडा आणि प्रश्न सोडवण्याची कणखर इच्छाशक्ती यामुळेच निखिल दादा "नेता" पेक्षा "समाजसेवक" म्हणून ओळखले जावेत अशी अपेक्षा बाळगतात. जनतेसमोर प्रामाणिक वचन आज सर्वसाधारण गटातून पक्षश्रेष्ठी ज्या उमेदवाराची निवड करतील. तो निखिल दादा असो किंवा त्यांची पत्नी इंद्रायणी काळकुटे त्या संधीचे सोने करण्याचे वचन ते जनतेसमोर देत आहेत. नागरिकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे, नवे विकास प्रकल्प आणणे आणि शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ या प्रभागातील शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचवणे, या उद्दिष्टासाठी ते कायम कटिबद्ध राहतील, असा ठाम विश्वास आहे.

"नगरसेवक म्हणून नव्हे, समाजसेवक म्हणून संधी द्या" हे त्यांचे आवाहन केवळ निवडणुकीचे घोषवाक्य नाही, तर आतापर्यंतच्या कामाचा आणि पुढील प्रवासाचा प्रामाणिक संकल्प आहे. नागरिकांनी दिलेली प्रत्येक मते ही त्यांच्या अपेक्षा, विश्वास आणि विकासाच्या स्वप्नांची पावती समजून त्याची जपणूक करण्याची तयारी त्यांनी दाखवली आहे. प्रभाग क्रमांक ८चा विकास, तरुणांचे भवितव्य आणि सुरक्षित, सुसज्ज, प्रगत परिसर घडवण्याची ही संधी आहे . आणि या संधीला न्याय देणारा समाजसेवक म्हणून निखिल दादा काळकुटे आपल्यासमोर उभे आहेत.



